REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 16 | ISSUE - 1 | OCTOBER - 2026

# 'ती फुलराणी'-(पु.ल.देशपांडे) : नवीन दृष्टिकोनातून एक अभ्यास

**सौ. आशा प्रदीप वाघ**
**(संशोधक विद्यार्थीनी)**

**डॉ. प्रा.अजय कुलकर्णी**
**मार्गदर्शक**

## गोषवारा (Abstract)




1968 मध्ये 'ती फुलराणी' हे नाटक पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेले नाटक जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या पिग्मॅलियन नाटकांचे रूपांतर नसून एक उत्कृष्ट अनुसर्जन आहे .समाजाच्या भाषेकडे न्यूनात्मक दृष्टीने बघणाऱ्या उच्चभ्रू संस्कृतीला पुलंनी दाखविलेला आरसा आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील समता आणि एकात्मता यांची वाट दाखविणारा 'ती फुलराणी' एक मैलाचा दगड आहे.हे नाटक पूर्णपणे मराठी व विशेषत: मुंबईच्या संस्कृतीचे दर्शन घडविते. या संशोधनात 'फुलराणी' ही व्यक्तिरेखा भाषिक अहंकार, वर्गभेद आणि स्त्री स्वातंत्र्य या संकल्पनेवर प्रकाश टाकते. 1968 साली लिहिलेलं पु. ल.देशपांडे यांचे 'ती फुलराणी' हे नाटक आजच्या युगात समकालीन वाटते.

त्या काळातील फुलबाजारातील फुलराणीचा प्रश्न भाषेचा होता. आजच्या घडीला भाषिक अहंकार आणि वर्गभेद, स्त्री स्वातंत्र्य हे दोन्ही ज्वलंत प्रश्न आहेत. आजच्या फुलराणीचा प्रश्न इंग्रजी भाषा विरुद्ध मराठी भाषा, वर्गभेद, सोशल क्लास, सोशल मीडिया यामध्ये स्त्री स्वातंत्र्याच्या विरोधाखाली प्रसिद्ध होणाऱ्या मिमस्, रील्स, बटबटीत व्यक्ती स्वातंत्र्य या संदर्भात पुन:र्मुल्यांकन केले आहे. भायखळ्याच्या फुलबाजारातील एका सामान्य फुलवालीच्या भाषेच्या अनुषंगाने उच्चभ्रू समाजातील स्त्रीमध्ये झालेले परिवर्तन व शेवटी तिचे स्वत्व हा प्रवास मुख्य गाभा आहे.

**शब्दसंकेत(Keywords) :** 'ती फुलराणी, पु. ल. देशपांडे, पिग्मॅलियन, भाषाशास्त्र ,वर्गभेद, स्त्री स्वातंत्र्य, भाषिक अहंकार,सोशल मीडिया, सेल्फ रिस्पेक्ट इ.

## प्रस्तावना

पिगमेलियन माणसाची वर्गीय संस्कृती त्याच्या बोलण्यावरून ठरते आणि त्यात सामाजिक न्याय नसतो हे सांगण्यासाठी आहे .हाच धागा पुलंनी आपल्या 'ती फुलराणी' या मराठी रंगभूमीवर 1960-70 च्या दशकात लिहिलेल्या सर्वात लोकप्रिय नाटकात साधला आहे .या नाटकाची मूळ कथा पाश्चात्त्य आहे. परंतु पु.लं नी तिला अस्सल मराठी बाणा दिला आहे.

1968 मध्ये प्राध्यापक अशोक जहागीरदार फुलराणीला शुद्ध मराठी शिकवत होते आणि आजच्या युगातील फुलराणीला इंग्रजी स्पिकिंग शिकवण्यासाठी अनेक अशोक तसेच सुपरनोवा ,सीवी असे ॲप निर्माण झाले आहेत. फक्त भाषा बदलली आहे, परंतु मानवी वृत्ती मात्र तीच कायम आहे. आज इंग्रजी बोलता येणाऱ्याला हुशार आणि मराठी बोलणाऱ्याला कमी लेखलं जातं.अनेक ठिकाणी कार्पोरेट ऑफिसमध्ये भाषेवरून,उच्चारावरून माणसाची किंमत ठरते. त्यामुळे ती फुलराणी हे नाटक जुने असून देखील जुन्या मूल्यांसह नवीन साज चढवलेले नवीनतम नाटक झाले आहे. स्वभाषेचा आग्रह, दुराग्रह भाषेच्या उच्चार पद्धतीवरून ठरणाऱ्या उच्चत्वाच्या कल्पना, जगभरच्या समाजात आजही रूढ आहेत.पुलंनी अशिक्षित मंजुळाचे भाषिक आणि सामाजिक उन्नयन कसे होत गेले ते अत्यंत समर्थपणे प्रत्ययकारी रीतीने दाखवून दिले आहे.

## संशोधनाची वैशिष्ट्ये-

1.1968 च्या 'ती फुलराणी' या नाटकाचे आजच्या घडीचे महत्त्व सांगणे.

2. आजच्या युगातील मराठी vs इंग्रजी चा भाषिक अहंकाराच्या अनुषंगाने अभ्यास करणे.

3. आजच्या स्त्री स्वातंत्र्याच्या कल्पनेशी 'ती फुलराणी' या नाटकाचा शेवट कसा जुळतो ते पाहणे.

4. सोशल मीडियाचा आजच्या युगातील स्त्री वर्गावरील प्रभाव स्पष्ट करणे.

5. पुलंचा विचार आजतागायत कसा व किती रिलीव्हन्ट आहे याचा अभ्यास करणे.

6. नाटकातील स्त्री स्वातंत्र्याच्या विचाराचा सामाजिक संदर्भात अभ्यास करणे.

## विषय विवेचन

'ती फुलराणी' मुंबईच्या भायखळ्याच्या फुलबाजारात फुलं विकणारी. मंजुळा तिचं नाव. प्राध्यापक अशोक सहा महिन्यात उच्चभ्रू स्त्री बनवण्याची पैज लावतात व त्यांचा प्रयोग यशस्वी होतो. परंतु कळसुत्री बाहुली प्रमाणे तिच्यावर भाषेचा प्रयोग केला जातो. परंतु त्याच वेळेला ती एक माणूस आहे, तिला सुद्धा स्त्री सुलभ भावना आहेत, याकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्या जाते. जेव्हा तिला कळतं की हा तिच्यावर केलेला भाषिक प्रयोग आहे ,एक पैज आहे. त्या वेळेला तिचा स्वाभिमान दुखावतो व शेवटी ती घर सोडून निघून जाते.

या नाटकात शुद्ध पुणेरी मराठी विरुद्ध मुंबई या, बम्बईया बोली जी फुलराणी बोलते ती बोली पुलं दाखवतात. म्हणजेच भाषिक वर्ग भेद त्या ठिकाणी दिसून येतो. या नाटकांमध्ये प्राध्यापक अशोक यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. पुलं फुलबाजारातील फुलराणीला सहा महिन्यात सुशिक्षित उच्चभ्रू स्त्री बनवण्याची पैज प्राध्यापक अशोक घेतात व प्रयोग यशस्वी करून दाखवतात. ती जणू काही प्रयोगशाळेतील एक कळसुत्री बाहुली आहे. तिथे भाषेला प्राधान्य दिल्या गेलेले आहे. प्राध्यापक अशोक यांचे शुद्ध पुणेरी मराठी विरुद्ध फुलराणीची मुंबईया, बंबईया बोली पुलं नी रंगविलेली आहे. हे नाटक गरीब विरुद्ध श्रीमंत या वर्ग भेदावर या संघर्षावर आहे. प्रोफेसर राज्याध्यक्ष हे उच्चभ्रू समाजातील आहेत त्याचे प्रतिनिधित्व ते करतात. ज्यांची विचारसरणी आहे की पैशाने आणि ज्ञानाने ते गरिबांना घडवू शकतात. त्यांच्यामध्ये वाटेल तसा बदल ते करू शकतात. परंतु शेवटी मंजुळा दाखवून देते की, व्यक्ती कुठल्याही समाजातील असो ती गरीब किंवा श्रीमंत असो प्रत्येक व्यक्तीला स्वाभिमान असतो. स्त्रीला केवळ शोभेची वस्तू समजणाऱ्या पुरुषी अहंकाराला हे नाटक चपराक देते.पु.लंनी शुद्धता उच्चारात नाही तर मनात असते. या अर्थपूर्ण संदेशाने नाटकाचा समारोप केला आहे. ती फक्त प्रयोग वस्तू म्हणून वापरली गेली

हे जेव्हा फुलराणी ला कळतं त्यावेळी तिचा स्वाभिमान जागृत होऊन ती घर सोडते व परत प्राध्यापक अशोक यांच्याकडे ती परत येत नाही. ती स्वतंत्र जीवन जगते. फेमिनिझमच्या दृष्टीने हे रंगभूमीवरील पहिले पाऊल होते.

## स्त्री चित्रण

आजच्या Me too आणि Women empowerment च्या युगात या नाटकाचे महत्त्व, त्यातील संदेश नव्याने अधोरेखित होते. फुलराणी म्हणते- "मला तुमच्या पिंजऱ्यातले सोने नको, मला माझ्या फुलांचा सुगंधच पुरेसा आहे" आजच्या स्त्रिया या संदेशानुरूप 'स्व' चे अस्तित्व जपताना दिसतात. आजची स्त्री ही आत्मनिर्भर, स्वाभिमानी, स्वतःसाठी लढणारी, प्रत्येक आव्हानांना तोंड देणारी, समाजाला प्रश्न विचारणारी, स्वतःचा स्वाभिमान जपणारी अशी आहे.Self Worth हे बाह्य Validation पेक्षा जास्त महत्त्वाचे आहे.

## भाषिक संघर्ष/ भाषेचा अहंकार

आजही व्यक्ती समाजात वापरताना कशी भाषा वापरतो ,कसा संवाद साधतो यावरून त्याची पत ठरविल्या जाते, तसेच अलीकडे मराठी भाषाविरुद्ध इंग्रजी भाषा हा संघर्ष वाढलेला आहे .ज्याला इंग्रजी भाषा गतिशीलरित्या, अस्खलितपणे बोलता येते, ती व्यक्ती हुशार समजल्या जाते व ज्यांना इंग्रजी बोलता येत नाही तो अडाणी .अशी प्रवृत्ती समाजात रूढ होतांना जाणवते. व्यक्तीची भाषा बोलतो ती भाषा फक्त व्याकरण नाही ,तर ती सामाजिक प्रतिष्ठा ठरवते. फुल बाजारातील मंजुळा सुरुवातीला अशुद्ध बोलते आणि म्हणून समाज तिला कमी लेखतो. आणि शुद्ध भाषा शिकल्यानंतर मंजुळे मध्ये आत्मविश्वास येतो. तिचं वागणं ,बोलणं तिच्या उच्चारावरून, राहणीमानावरून समाज तिला 'राणी' मानतो. भाषिक विषमता व सामाजिक विषमता हा संघर्ष या ठिकाणी जाणवतो. आजही भाषिक वाद ,राहणीमान ,उच्चारावरून माणसाची किंमत ठरत असते.त्यामुळे फुलराणी हे नाटक आजच्या काळात समकालीन वाटते.

## निष्कर्ष

आजच्या युगात प्रत्येक ठिकाणी प्रत्येक विद्यालय, महाविद्यालयामध्ये प्रत्येक ऑफिस ,कार्पोरेट वर्ल्ड सर्वच ठिकाणी एक फुलराणी आणि प्राध्यापक अशोक आहेत. जोपर्यंत आपण माणसाला त्याच्या कपड्यावरून, भाषेवरून त्याची किंमत ठरवू ;तोपर्यंत फुलराणी जिवंत राहील, नाटकाचा गाभा कायम राहील. आजचा प्रा. अशोक म्हणजे सोशल मीडिया,इंग्लिश कोचिंग क्लास, ओरिएटर, स्पीकर, कार्पोरेट ट्रेनर जो सांगतो ,शिकवतो. पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट म्हणजे फक्त चांगले इंग्रजी बोलता येणे. तो व्यक्तीला बाहेरून चमकवतो; पण आतून तिला कळसुत्री बाहुली किंवा व्यक्ती समजतो ,वस्तू समजतो.ती फुलराणी आपल्याला शिकवण देते की instagram Filters,AI, Gemini ,ब्रँडेड कपडे हे तुम्हाला सुंदर दाखवतील,मनुष्य सुंदरही दिसेल. परंतु बाह्य सौंदर्य पेक्षा अंतर्मनाचे सौंदर्य जास्त महत्त्वाचे आहे.खरे सौंदर्य आपल्या स्वाभिमानात आहे. म्हणूनच 1968 चे नाटक 2026 मध्ये एक ज्वलंत उदाहरण म्हणून सत्य आहे .

## संदर्भ :

1. देशपांडे पु.लं.- ती फुलराणी
2. शा.जी.बी -पिग्मॅलियन